जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१७/ ७२४९
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- ०८/१२/ २०१७

प्रति,

**संस्थाचालक / प्राचार्य**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जानेवारी - २०१८**
**परीक्षा केंद्र निवडणेबाबत.**

**संदर्भ :- जीसीसी-टीबीसी परीक्षा जानेवारी २०१८, दि. ०६ /११/ २०१७ रोजीची अधिसूचना.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा एकूण सुमारे ३०५ केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. दि. ०२ जोनवारी ते ०८ जानेवारी या कालावधीत इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. या विषयाची ऑनलाईन परीक्षा घेतली जाईल. तर मराठी/हिंदी ३० व ४० श.प्र.मि. या विषयाची ऑनलाईन परीक्षा दि.१३ जानेवारी ते १८ जानेवारी २०१८ या कालावधीत घेतली जाईल.

१. ज्या तालुक्यात परीक्षा केंद्र उपलब्ध आहे त्या तालुक्यातील संस्थांनी आपल्या तालुक्यातीलच परीक्षा केंद्राची निवड करावी परीक्षा केंद्राच्या ड्रापड्राऊन लिस्टमध्ये आपल्या तालुक्यातील परीक्षा केंद्र नसल्यासच आपल्या जिल्ह्यातील जवळचे अन्य परीक्षा केंद्र निवडावे.
२. संस्था ज्या तालुक्यात आहे त्या तालुक्या परीक्षा केंद्रा उपलब्ध असताना दुसऱ्या तालुक्यातील परीक्षा केंद्रा निवडल्यास परीक्षा परिषदेकडून अशा संस्थांची केंद्र निवड रद्द करण्यात येईल पर्यायाने त्या संस्थेतील परीक्षार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार नाही.
३. ही परीक्षा केंद्रा निवड इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. परीक्षेसाठी असेल. मराठी/हिंदी ३० व ० श.प्र.मि. साठी संस्थांनी इंग्रजीसाठी निवडलेल्या केंद्रावर क्षमता उपलब्ध नसेल तर परिषदेकडून उपलब्ध असलेले जवळचे परीक्षा केंद्र देण्यात येईल. (म्हणजेच मराठी/हिंदी GCC-TBC ३० व ४० श.प्र.मि. परीक्षेसाठी संस्थांना केंद्र निवडीसाठी पर्याय उपलब्ध करुन दिला जाणार नाही.)
४. दि. ०८ डिसेंबर २०१७ ते दि. ११ डिसेंबर २०१७ या कालावधीत परीक्षा केंद्र निवडीची Link उपलब्ध राहील. त्यानुसार या विहित मुदतीत परीक्षा केंद्र निवड संस्थांनी Login द्वारे ऑनलाईन पद्धतीने करावी.
५. केंद्रनिवडीबाबत टपालाने, ई-मेलने पत्रव्यवहार करु नये.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत :-**

१. **शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व.**
२. **शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प)**